Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

पुण्यातील १०१ पालिका शाळांना रविवारपर्यंत सुट्टी

(पान २ वर)




। मंगळवार, दि. ०७ जूलै २०२६ । वर्ष १ । अंक ८९ । पाने २। Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

## » Selected

### भरधाव बसची टेम्पोला धडक १३ वर्षीय मुलाचा मृत्यू

पारोळा | पारोळा तालुक्यातील मेहु–टेहू मार्गावरील भामरखेडा येथील मारुती मंदिराजवळ रविवारी (५ जुलै) दुपारी सुमारे ३.३० वाजता झालेल्या भीषण अपघातात १३ वर्षीय मुलाचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, टाटा टेम्पो (क्र. एमएच ४३ बीजी ४२६६) पारोळा येथून शिरसमणीकडे जात असताना त्याच्या पाठीमागून येणाऱ्या पारोळा–करमाड–रताळे मार्गावरील बसने टेम्पोला जोरदार धडक दिली. धडकेच्या तीव्रतेमुळे टेम्पोमधील प्रवासी कमिश सीताराम पावरा (वय १३, रा. किंदी आंबा, ता. सेंधवा, जि. बडवानी, मध्य प्रदेश) हा रस्त्यावर फेकला गेला. त्याचवेळी तो बसच्या चाकाखाली आल्याने त्याचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला. या प्रकरणी प्रशांत पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीवरून बसचालक अभिमन पाटीलयांच्याविरुद्ध पारोळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### तुकाराम मुंडेंकडून 'केमिकल दूध' रॅकेटचा पर्दाफाश, १३ आरोपी जेरबंद

# दूध भेसळ माफियांवर सर्वात मोठा प्रहार!

## पाच जिल्ह्यांत संयुक्त धाड; अडीच ते तीन कोटींचा मुद्देमाल जप्त, आणखी दोन टोळ्यांचा शोध सुरू

**जन सम्राट टाईम्स**

मुंबई । राज्यातील अन्नभेसळ माफियांविरोधात मोठी मोहीम उघडलेल्या अन्न व औषध प्रशासन (FDA) विभागाने आता दूध भेसळ माफियांवर आतापर्यंतची सर्वात मोठी कारवाई करत मोठे रॅकेट उध्वस्त केले आहे. अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील पाच जिल्ह्यांमध्ये एकाच वेळी धाडसत्र राबवण्यात आले.

- महिनाभराच्या गुप्त तपासानंतर FDA आणि
- पोलिसांची मोठी कारवाई
- मंचरमधून चालत होते बनावट दुधाचे रॅकेट
- पुणे, जळगाव, ठाणे, सोलापूर, धाराशिवसह
- अनेक जिल्ह्यांपर्यंत जाळे १३ आरोपींना अटक



या कारवाईत १३ आरोपींना अटक करण्यात आली असून अडीच ते तीन कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.मुंढे यांनी दिलेल्या माहितीनुसार, ही कारवाई कोणत्याही तक्रारीवर आधारित नसून, जवळपास महिनाभराच्या गुप्त तपास, तांत्रिक माहिती आणि पडताळणीनंतर करण्यात आली. कृत्रिम किंवा केमिकलयुक्त दूध तयार करून बाजारात विक्री करणाऱ्या टोळीवर बराच काळ गुप्तपणे नजर ठेवण्यात आली होती. आरोपी रंगेहात सापडावेत यासाठी तपास पथकाने योग्य वेळेची प्रतीक्षा केली आणि अखेर मोठी कारवाई यशस्वी ठरली. या मोहिमेत अन्न व औषध प्रशासन आणि महाराष्ट्र पोलीस यांनी संयुक्तरीत्या छापे टाकले. तपासादरम्यान मंचर परिसरातून संपूर्ण रॅकेट कार्यरत असल्याचे स्पष्ट झाले. हे रॅकेट केवळ एका जिल्ह्यापुरते मर्यादित नसून पुणे, सोलापूर, जळगाव, ठाणे, धाराशिव आणि जालना या जिल्ह्यांपर्यंत त्याचे जाळे पसरल्याची प्राथमिक माहिती तपासात समोर आली आहे. आयुक्त तुकाराम मुंढे यांनी सांगितले की, "दुधाबाबत करण्यात आलेली ही आमची आतापर्यंतची सर्वात मोठी कारवाई आहे. काही दिवसांपूर्वी एका व्यक्तीने कृत्रिम दूध तयार करून त्याचा पुरवठा होत असल्याची माहिती दिली होती. त्यानंतर आमच्या पथकाने अत्यंत गोपनीय पद्धतीने तपास सुरू केला. माहितीची शहानिशा झाल्यानंतर योग्य नियोजन करून ही धडक कारवाई करण्यात आली." तपासादरम्यान केवळ दूध उत्पादकच नव्हे, तर काही किराणा दुकानदारांचाही या गैरव्यवहारात सहभाग असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे या संपूर्ण साखळीचा तपास अधिक व्यापक करण्यात आला असून आर्थिक व्यवहार, पुरवठा साखळी आणि संबंधित व्यक्तींची चौकशी सुरू आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपीसह १३ जणांना अटक करण्यात आली असून न्यायालयाने त्यांना ९ जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. तपास यंत्रणांच्या हाती महत्त्वाचे धागेदोरे लागले असून, राज्यात अशाच प्रकारे कार्यरत असलेल्या आणखी दोन टोळ्यांचा शोध सुरू असल्याची माहितीही मुंढे यांनी दिली.

### मकोका लावण्याचाही विचार सुरू

या गंभीर गुन्ह्यात संबंधित आरोपींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची तयारी सुरू आहे. तपासादरम्यान संघटित गुन्हेगारीचे पुरावे समोर आल्यास महाराष्ट्र संघटित गुन्हे नियंत्रण कायदा (मकोका) लावण्याचाही विचार सुरू असल्याचे संकेत त्यांनी दिले. राज्यातील नागरिकांच्या आरोग्याशी थेट खेळ करणाऱ्या दूध भेसळ माफियांविरोधातील ही कारवाई अत्यंत महत्त्वाची मानली जात असून, अन्नभेसळ रोखण्यासाठी FDA पुढील काळातही अशाच धडक मोहिमा सुरू ठेवणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

## धुळे जिल्ह्यात AIMIM च्या नव्या पदाधिकाऱ्यांची नियुक्ती

### ओवेसी यांच्या निर्देशानुसार नियुक्त्या




**जन सम्राट टाईम्स**

**धुळे | प्रतिनिधी:** ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल-मुस्लिमीन (AIMIM) पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष बॅरिस्टर असदुद्दीन ओवेसी यांच्या आदेशानुसार तसेच महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष व माजी खासदार इम्तियाज जलील यांच्या मान्यतेने धुळे जिल्ह्यात पक्षाच्या नव्या पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

नियुक्तीनुसार रियाज अली शेख यांची जिल्हाध्यक्ष, शोएब अन्सारी यांची शहराध्यक्ष, तर सनी वाडेकर यांची युवक जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. या नियुक्तीनंतर AIMIM च्या मुख्य कार्यालयात नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी पक्षाचे नेते इर्शाद भाई जागीरदार, गटनेते लल्लू शेठ अन्सारी, नगरसेवक वसीम मंत्री, साजिद अली साई, शब्बीर पिंजारी, मुखर्जी, आमिर पठाण, मिर्झा तसेच पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना इर्शाद भाई जागीरदार यांनी AIMIM हा सर्व समाजाला सोबत घेऊन काम करणारा पक्ष असल्याचे सांगितले. शहरातील नागरिकांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी नव्या पदाधिकाऱ्यांनी सक्रियपणे काम करावे, असे आवाहन त्यांनी केले. नियुक्तीनुसार रियाज अली शेख यांची जिल्हाध्यक्ष, शोएब अन्सारी यांची शहराध्यक्ष, तर सनी वाडेकर यांची युवक जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. या नियुक्तीनंतर AIMIM च्या मुख्य कार्यालयात नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच, पक्ष धर्मनिरपेक्ष विचारसरणीवर कार्य करत असून सामाजिक प्रश्नांवर सकारात्मक भूमिका घेत राहील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## सारोळा शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा मराठा गौरव युवराज (भाऊ) काशिद यांच्या हस्ते सन्मान

### इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव; शिक्षक व केंद्रप्रमुखांचाही सत्कार

**जन सम्राट टाईम्स**

**जामखेड | प्रतिनिधी:** जामखेड तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सारोळा येथे इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळविणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. मराठा गौरव युवराज (भाऊ) काशिद, सरपंच अजय (दादा) काशिद, मकरंद (आबा) काशिद आणि केंद्रप्रमुख माजिद शेख यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान मिळविणाऱ्या साक्षी गोवर्धन मुळे, पूनम राम जगदाळे आणि पवन दादासाहेब जगदाळे या विद्यार्थ्यांचा त्यांच्या पालकांसह सत्कार करण्यात आला. या यशामुळे संबंधित विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी ₹७,५०० प्रमाणे दोन वर्षांसाठी एकूण ₹१५,००० शिष्यवृत्ती मिळणार आहे. यंदा इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत



पात्र ठरलेल्या १३ विद्यार्थ्यांपैकी ३ विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती मिळविली, तर NMMS परीक्षेत पात्र ठरलेल्या ११ विद्यार्थ्यांपैकी एका विद्यार्थ्याने शिष्यवृत्ती संपादन केली. या उल्लेखनीय यशाबद्दल इयत्ता आठवीचे वर्गशिक्षक राहुल लिमकर यांचा विशेष सन्मान करण्यात आला. तसेच इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत १५ विद्यार्थी पात्र झाल्याबद्दल वर्गशिक्षिका अमृता रसाळ यांचाही गौरव करण्यात आला. सारोळा शाळेचे माजी मुख्याध्यापक तथा राजुरी केंद्राचे नूतन केंद्रप्रमुख माजिद शेख यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी शाळेच्या उत्कृष्ट शिष्यवृत्ती निकालाचे कौतुक करत शिक्षक, विद्यार्थी आणि पालकांचे अभिनंदन केले.शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सतीश मुळे, मुख्याध्यापक संदीप भालसिंग, शिक्षक सुरेश बर्वे, राहुल लिमकर, प्रशांत होळकर, शबाना शेख, वृषाली खांदवे, अमृता रसाळ, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सावद्यात ‘स्वस्तिक क्लिनिक’चा शुभारंभ

**जन सम्राट टाईम्स**

**सावदा| प्रतिनिधी :** सावदा शहरातील साळीबाग परिसरात नागरिकांना दर्जेदार आणि सुलभ आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ‘स्वस्तिक क्लिनिक’ या नव्या आरोग्य केंद्राचा शुभारंभ करण्यात आला आहे. या क्लिनिकमध्ये डॉ. देशभूषण अ. सैंतवाल (बी.ए.एम.एस.) हे जनरल आणि फॅमिली फिजिशियन म्हणून सेवा देणार आहेत. दैनंदिन आरोग्यविषयक समस्या, प्राथमिक उपचार, वैद्यकीय सल्ला आणि कुटुंबीयांसाठी आवश्यक आरोग्य सेवा या ठिकाणी उपलब्ध होणार असल्याने परिसरातील नागरिकांना याचा लाभ मिळणार आहे. क्लिनिकची माहिती डॉक्टर: डॉ. देशभूषण अ. सैंतवाल (बी.ए.एम.एस.) सेवा: जनरल व फॅमिली फिजिशियन पत्ता: साळीबाग, सावदा नोंदणी क्रमांक: 1-83980-A संपर्क: 8668729844 सावदा व परिसरातील नागरिकांना दर्जेदार वैद्यकीय सेवा स्थानिक पातळीवर उपलब्ध होण्यास मदत होणार असून, आरोग्य क्षेत्रातील ही एक सकारात्मक पाऊल मानले जात आहे.

## जळगाव जिल्हा बँक संचालकांच्या अपात्रतेच्या मागणीची सहकार आयुक्तांकडून दखल!

**जन सम्राट टाईम्स**

**जळगाव प्रतिनिधी:** जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या अपात्रतेसंदर्भात करण्यात आलेल्या मागणीची सहकार आयुक्त तथा निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य यांनी दखल घेतली असून, या प्रकरणात विभागीय सहनिबंधक, नाशिक यांना तातडीने आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. या घडामोडीमुळे जिल्ह्यातील सहकार क्षेत्रात मोठी चर्चा सुरू झाली आहे. झुरखेडा (ता. जळगाव) येथील लोकनियुक्त सरपंच सुरेशआप्पा गो. पाटील यांनी सहकार आयुक्तांकडे




सविस्तर निवेदन सादर करून जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या विद्यमान संचालक मंडळावर अपात्रतेची कारवाई करण्याची मागणी केली होती. त्यांच्या निवेदनात बँकिंग रेग्युलेशन (सुधारणा) अधिनियम, २०२५, रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सूचना तसेच राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या निर्देशांचा उल्लेख करण्यात आला होता. या निवेदनाची दखल घेत सहकार आयुक्त कार्यालयाने संबंधित प्रकरण विभागीय सहनिबंधक, नाशिक यांच्याकडे पाठविले असून, आवश्यक ती कायदेशीर व प्रशासकीय कार्यवाही करून अर्जदाराला त्याबाबत कळविण्याचे निर्देश दिले आहेत. या निर्णयामुळे जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या वैधतेबाबत पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सहकार क्षेत्रात या विषयाची जोरदार चर्चा सुरू असून, विभागीय सहनिबंधक या प्रकरणात कोणती भूमिका घेतात आणि पुढील कायदेशीर प्रक्रिया कशी राबविली जाते, याकडे जिल्ह्यातील सहकारी संस्थांचे पदाधिकारी, सभासद आणि राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. दरम्यान, सहकार आयुक्तांनी केवळ निवेदनाची दखल घेत संबंधित अधिकाऱ्यांना कार्यवाहीचे निर्देश दिले असून, अंतिम निर्णय अद्याप झालेला नाही. त्यामुळे पुढील चौकशी आणि कायदेशीर प्रक्रियेनंतरच संचालक मंडळाच्या अपात्रतेबाबतचा अंतिम निर्णय स्पष्ट होणार आहे.

जन सम्राट टाईम्स — अँकर न्यूज

# शिरपूर शहर पोलिसांची घरफोडी प्रकरणात मोठी कामगिरी

## चोरीतील टीव्ही, एसी आणि दोन लॅपटॉप जप्त; ७४ हजारांचा मुद्देमालासह आरोपी जेरबंद

**जन सम्राट टाईम्स**

**शिरपूर | प्रतिनिधी :** शिरपूर शहरात घडलेल्या घरफोडीच्या गुन्ह्याची यशस्वी उकल करत शिरपूर शहर पोलिसांच्या डी.बी. पथकाने एका सराईत आरोपीला अटक केली असून, त्याच्याकडून ७४ हजार रुपये किमतीचा चोरीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. या कारवाईमुळे शहरातील घरफोडीच्या गुन्ह्याला चाप बसला असून पोलिसांच्या तत्परतेचे कौतुक होत आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १ जुलै २०२६ रोजी रात्री १०.४५ ते २ जुलै रोजी दुपारी १२ वाजेच्या दरम्यान अज्ञात चोरट्याने फिर्यादीच्या राहत्या घराचा कडी-कोंडा उचकवून घरात प्रवेश केला. त्यानंतर घरातील १४ हजार




रुपयांचा टीव्ही, २० हजार रुपयांचा एसी आणि ४० हजार रुपये किमतीचे दोन लॅपटॉप असा एकूण ७४ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. याप्रकरणी शिरपूर शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ३०५(अ), ३३१(३) व ३३१(४) अन्वये घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल होताच पोलीस निरीक्षक किशोरकुमार परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली डी.बी. पथकाने घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीजन्य पुरावे संकलित केले. तांत्रिक विश्लेषण, गोपनीय माहिती आणि स्थानिक सूत्रांच्या आधारे पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली. तपासादरम्यान मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे ६ जुलै रोजी खर्दे बुद्रुक (ता. शिरपूर) येथील बसस्थानक परिसरातून रविंद्र राजेंद्र पावरायाला ताब्यात घेण्यात आले. सखोल चौकशीत त्याने घरफोडीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. त्यानंतर त्याच्याकडून चोरीस गेलेला टीव्ही, एसी आणि दोन लॅपटॉप असा संपूर्ण मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कारवाईमुळे घरफोडीचा गुन्हा उघडकीस आला असून आरोपीविरुद्ध पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू आहे. तसेच आरोपीच्या इतर गुन्हेगारी पार्श्वभूमीचाही पोलीस तपास करत आहेत. ही उल्लेखनीय कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सुधीर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किशोरकुमार परदेशी यांच्या नेतृत्वात डी.बी. पथकातील पोलीस अंमलदार रविंद्र आखडमल, अतुल पाटील, विनोद आखडमल, भटू साळुंके, गोविंद कोळी, मनोज दाभाडे, सचिन वाघ, प्रशांत पवार, मनोज महाजन, योगेश दाभाडे, सोमा ठाकरे, आरिफ तडवी तसेच होमगार्ड मिथुन पावरा यांनी संयुक्तपणे पार पाडली. शिरपूर शहर पोलिसांच्या या जलद आणि प्रभावी कारवाईमुळे नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना अधिक बळकट झाली आहे.

### कारवाईमुळे घरफोडीच्या गुन्ह्याला चाप बसला

या कारवाईमुळे शहरातील घरफोडीच्या गुन्ह्याला चाप बसला असून पोलिसांच्या तत्परतेचे कौतुक होत आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १ जुलै २०२६ रोजी रात्री १०.४५ ते २ जुलै रोजी दुपारी १२ वाजेच्या दरम्यान अज्ञात चोरट्याने फिर्यादीच्या राहत्या घराचा कडी-कोंडा उचकवून घरात प्रवेश केला. त्यानंतर घरातील १४ हजार रुपयांचा टीव्ही, २० हजार रुपयांचा एसी आणि ४० हजार रुपये किमतीचे दोन लॅपटॉप असा एकूण ७४ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. याप्रकरणी शिरपूर शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ३०५(अ), ३३१(३) व ३३१(४) अन्वये घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

## BLO कामामुळे प्राथमिक शाळांच्या वेळेत बदल!

### सकाळी ७ ते दुपारी १२.३५ पर्यंत वर्ग

**जन सम्राट टाईम्स**

**जळगाव | प्रतिनिधी :** मतदार यादीच्या विशेष सखोल पुनर्निरीक्षण (SPECIAL INTENSIVE REVISION - SIR) मोहिमेसाठी मोठ्या प्रमाणावर शिक्षकांची केंद्रस्तरीय मतदान अधिकारी (BLO) म्हणून नियुक्ती करण्यात आल्याने जळगाव जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या तसेच खासगी प्राथमिक शाळांच्या वेळेत तात्पुरता बदल करण्यात आला आहे. जळगांव जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी करिश्मा नायर (भा.प्र.से.) यांनी यासंदर्भातील आदेश जारी केले असून, सोमवार ते शुक्रवार शाळा सकाळी ७.०० ते दुपारी १२.३५ या वेळेत भरविण्यात येणार आहेत. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या २७ जून २०२६ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने हा निर्णय घेण्यात आला आहे. २९ जूनपासून बहुतांश शिक्षकांवर BLO म्हणून मतदार यादी पुनर्निरीक्षणाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्यामुळे निवडणूक कामकाज आणि विद्यार्थ्यांचे अध्यापन या दोन्ही गोष्टी सुरळीत पार पडाव्यात, या उद्देशाने शालेय वेळेत बदल करण्यात आला आहे. जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार, सोमवार ते शुक्रवार शाळा सकाळी ७.०० ते दुपारी १२.३५ या वेळेत चालतील. शनिवारी मात्र शाळा नियमित वेळेतच भरतील. तसेच अखेरच्या कला, क्रीडा आणि कार्यानुभवाच्या तासिकांऐवजी नियमित अध्यापन तासिका घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. याशिवाय, जिल्हास्तरीय नियोजनानुसार 'निपुण' तासिका सकाळी ११.०० ते १२.०० या नियमित वेळेतच घेण्यात येणार असल्याचेही आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

# मुसळधार पावसाने महाराष्ट्रात हाहाकार!

## मुख्यमंत्री फडणवीसांचे खासगी कंपन्यांना 'वर्क फ्रॉम होम'चे निर्देश, प्रशासन हाय अलर्टवर

जन सम्राट टाईम्स

**मुंबई :** महाराष्ट्रात सुरू असलेल्या मुसळधार पावसाने जनजीवन विस्कळीत झाले असून मुंबई, पुणे, ठाणे, रायगड, पालघर, कोकण आणि घाटमाथ्यासह अनेक भागांमध्ये पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. भारतीय हवामान विभागाने राज्यात ८ जुलैपर्यंत मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा दिल्याने संपूर्ण यंत्रणा सतर्क झाली आहे.

या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्य आपत्ती नियंत्रण कक्षात उच्चस्तरीय आढावा बैठक घेत प्रशासनाला युद्धपातळीवर काम करण्याच्या सूचना दिल्या. त्याचबरोबर खासगी कंपन्या आणि आस्थापनांनी कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत शक्य तेथे *"वर्क फ्रॉम होम"*ची सुविधा उपलब्ध करून द्यावी, असे निर्देश त्यांनी दिल्याचे सांगितले जात आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी नागरिकांना अत्यंत आवश्यक कामाशिवाय घराबाहेर न पडण्याचे आवाहन करत जिल्हाधिकारी, पोलीस, महसूल, आपत्ती व्यवस्थापन तसेच अन्य संबंधित यंत्रणांना २४ तास सज्ज राहण्याचे आदेश दिले आहेत.

पावसामुळे अनेक ठिकाणी नद्या धोक्याच्या पातळीवर वाहत असून सखल भागांमध्ये पाणी साचल्याने वाहतुकीवर मोठा परिणाम झाला आहे. मुख्यमंत्री म्हणाले की, सध्याची परिस्थिती लक्षात घेता कर्मचाऱ्यांना प्रवासाचा धोका टाळण्यासाठी शक्य तिथे घरून काम करण्याची सुविधा देणे आवश्यक आहे. मानवी दृष्टिकोनातून उद्योग, आयटी कंपन्या आणि खासगी आस्थापनांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. तसेच नागरिकांनी हवामान विभाग आणि स्थानिक प्रशासनाच्या सूचनांचे काटेकोर पालन करावे, असेही त्यांनी स्पष्ट केले. अतिवृष्टीमुळे मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील काही घाटमाथ्याच्या भागांत दरडी कोसळल्याच्या घटनांमुळे वाहतुकीवर परिणाम झाला आहे. महामार्गावरील माती व दगड हटविण्यासाठी यंत्रणा युद्धपातळीवर कार्यरत असून वाहतूक सुरळीत करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. संभाव्य भूस्खलनग्रस्त भागांवर प्रशासनाचे विशेष लक्ष असून आवश्यक त्या ठिकाणी सुरक्षा उपाययोजना वाढविण्यात आल्या आहेत.मुंबई, पुणे, ठाणे आणि कोकणातील अनेक भागांमध्ये मुसळधार पावसामुळे रस्ते जलमय झाले.

असून रेल्वे व रस्ते वाहतुकीवरही परिणाम झाला आहे. अनेक ठिकाणी झाडे कोसळणे, भिंती ढासळणे, घरांमध्ये पाणी शिरणे आणि वीजपुरवठा खंडित होण्याच्या घटनाही समोर आल्या आहेत. बचाव पथके, अग्निशमन दल, एनडीआरएफ आणि स्थानिक प्रशासन सतत परिस्थितीवर लक्ष ठेवून मदतकार्य करत आहेत.



### सुप्रिया सुळेंची सरकारवर टीका



दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी राज्यातील परिस्थितीवर तीव्र चिंता व्यक्त केली आहे. राज्यातील पूरस्थिती, वाहतूक व्यवस्था आणि नागरिकांना होत असलेल्या त्रासाच्या पार्श्वभूमीवर सरकारने अधिक प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी त्यांनी केली. तसेच परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन राज्य सरकारने तातडीने सर्वंकष निर्णय घेण्याची गरज असल्याचे त्यांनी म्हटले. राज्यात पुढील काही दिवसही मुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आल्याने नागरिकांनी नदी-नाले, धरण परिसर आणि पाण्याने भरलेल्या रस्त्यांपासून दूर राहावे, अफवांवर विश्वास ठेवू नये आणि प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

---

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

# BLO सहाय्यक शिक्षकांच्या नियुक्त्या रद्द करा!

## शैक्षणिक गुणवत्तेवर परिणामाची भीती



जन सम्राट टाईम्स

**भुसावळ। प्रतिनिधी :** जळगाव जिल्ह्यात मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) यांना सहाय्य करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर शिक्षकांची BLO सहाय्यक म्हणून नियुक्ती करण्यात आल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असल्याचे सांगत महाराष्ट्र माध्यमिक शिक्षक संघ (फेडरेशन) यांनी या नियुक्त्या तात्काळ रद्द करण्याची मागणी केली आहे. यासंदर्भात भुसावळ तहसीलदार यांना १२४ शिक्षकांच्या स्वाक्षरीसह निवेदन सादर करण्यात आले. संघटनेच्या निवेदनात म्हटले आहे की, केंद्रीय निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार सुरू असलेल्या विशेष मतदार यादी पुनरावलोकन (SIR) प्रक्रियेसाठी BLO अधिकाऱ्यांना सहाय्यक म्हणून शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे शिक्षकांना शैक्षणिक कामकाजाबरोबरच अतिरिक्त जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागत असून विद्यार्थ्यांच्या अध्यापनावर परिणाम होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. संघटनेने BLO सहाय्यक म्हणून शिक्षकांऐवजी ग्रामसेवक, तलाठी, महावितरण कर्मचारी, अंगणवाडी सेविका तसेच इतर शासकीय कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याची मागणी केली आहे. निवेदनात धाराशिव जिल्ह्याचा दाखलाही देण्यात आला आहे. धाराशिव जिल्हाधिकाऱ्यांनी ३० जून २०२६ रोजी आदेश काढून BLO सहाय्यक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या शिक्षकांच्या नियुक्त्या रद्द केल्या असून त्यांच्या जागी इतर शासकीय कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याचे निर्देश दिल्याचे संघटनेने नमूद केले आहे. याच धर्तीवर भुसावळ प्रशासनानेही तातडीने निर्णय घेऊन शिक्षकांना BLO सहाय्यक पदाच्या अतिरिक्त जबाबदारीतून मुक्त करावे, अशी मागणी महाराष्ट्र माध्यमिक शिक्षक संघाने केली आहे.

### शासकीय कर्मचाऱ्यांची नियुक्तीची मागणी

शिक्षकांना शैक्षणिक कामकाजाबरोबरच अतिरिक्त जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागत असून विद्यार्थ्यांच्या अध्यापनावर परिणाम होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. शिक्षकांऐवजी ग्रामसेवक, तलाठी, महावितरण कर्मचारी, अंगणवाडी सेविका तसेच इतर शासकीय कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याची मागणी केली आहे.

---

# निंभोरा बुद्रुकमध्ये भटक्या कुत्र्यांचा वाढता उपद्रव!

जन सम्राट टाईम्स



**भुसावळ। प्रतिनिधी :** भुसावळ तालुक्यातील निंभोरा बुद्रुक येथे कचऱ्याचे वाढते ढीग आणि भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या उपद्रवामुळे नागरिकांचे दैनंदिन जीवन त्रस्त झाले आहे. गावातील अस्वच्छतेमुळे रोगराई पसरण्याची भीती व्यक्त होत असून, भटक्या कुत्र्यांमुळे लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. या गंभीर समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी पत्रकार प्रकाश सरदार यांच्या नेतृत्वाखाली ग्रामविकास अधिकारी व प्रशासक सरपंच यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनावर रमेशभाऊ खंडारे, उस्मान पठाण, पुंडलिक पाटील, मनोहर निगोते, डॉ. प्रमोद पाटील, सोमा बऱ्हाटे, प्रमोद झांबरे, सचिन जावळे, बी. आर. सरोदे आणि अरुण पाटील यांच्यासह दहा नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

निवेदनात गावातील कचऱ्याचे ढीग तातडीने हटवावेत तसेच भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त पुढील १५ दिवसांत करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

या मागण्यांची पूर्तता न झाल्यास ग्रामस्थांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही प्रशासनाला देण्यात आला आहे. स्थानिक नागरिकांनी प्रशासनाने या समस्येची गांभीर्याने दखल घेऊन त्वरित स्वच्छता मोहीम राबवावी आणि भटक्या कुत्र्यांच्या नियंत्रणासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे.

---

# युगप्रवर्तक हेडगेवार' नाटकादरम्यान संविधान सेनेचे आंदोलन; पोलिसांनी आंदोलकांना घेतले ताब्यात

## काही काळ तणाव; कडेकोट पोलीस बंदोबस्तात नाटकाचा प्रयोग पार

जन सम्राट टाईम्स

**धुळे (प्रतिनिधी):** धुळे शहरातील हिरे भवन येथे भारत विकास परिषदेच्या वतीने रविवारी आयोजित करण्यात आलेल्या 'युगप्रवर्तक हेडगेवार' या नाटकादरम्यान भारतीय संविधान सेनेच्या कार्यकर्त्यांनी आंदोलन करत निषेध नोंदविला. या आंदोलनामुळे काही काळ परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी आंदोलकांना ताब्यात घेतल्यानंतर नाटकाचा प्रयोग सुरळीतपणे पार पडला. डॉ. केशवराव हेडगेवार यांच्या जीवनावर आधारित या नाटकाला भारतीय संविधान सेनेने यापूर्वीच विरोध दर्शविला होता. त्याअंतर्गत



शनिवारी नाटकाच्या प्रसिद्धीसाठी लावण्यात आलेले बॅनर फाडून निषेध नोंदविण्यात आला होता. रविवारी नाटक सुरू होताच संविधान सेनेचे कार्यकर्ते हिरे भवन परिसरात दाखल झाले. आंदोलकांनी काळे झेंडे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे छायाचित्र हातात घेऊन घोषणाबाजी केली. पोलिसांनी त्यांना रोखण्याचा प्रयत्न करताच काही काळ धक्काबुक्की आणि झटापट झाल्याचे पाहायला मिळाले. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिसांनी तातडीने हस्तक्षेप करून आंदोलन करणाऱ्या कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले. त्यानंतर परिस्थिती नियंत्रणात आली आणि नाटकाचा प्रयोग नियोजितप्रमाणे सुरू ठेवण्यात आला. दरम्यान, या आंदोलनामुळे काही काळ परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी आंदोलकांना ताब्यात घेतल्यानंतर नाटकाचा प्रयोग सुरळीतपणे पार पडला. घटनास्थळी उपस्थित असलेल्या भाजपच्या काही कार्यकर्त्यांनी *"जय श्रीराम"*च्या घोषणा दिल्याने काही काळ वातावरण अधिक तापले होते. कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून हिरे भवन परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. या घटनेमुळे धुळे शहरात दिवसभर राजकीय आणि सामाजिक वर्तुळात चर्चेला उधाण आले असून, पोलिसांनी संपूर्ण परिस्थितीवर लक्ष ठेवत शांतता व कायदा-सुव्यवस्था कायम राखली.

---

# कांचन नगर–आसोदा रोड खड्डेमय; नागरिकांचा संताप, आंदोलनाचा इशारा

जन सम्राट टाईम्स

**जळगाव । प्रतिनिधी :** जळगाव शहरातील कांचन नगर ते आसोदा रोड हा प्रमुख संपर्क मार्ग गेल्या अनेक महिन्यांपासून खड्ड्यांनी व्यापला असून, वाहनचालक आणि स्थानिक नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. रस्त्याच्या दुरवस्थेमुळे अपघातांचे प्रमाण वाढत असल्याचा दावा नागरिकांनी केला असून, महानगरपालिका प्रशासन आणि स्थानिक लोकप्रतिनिधींकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोपही करण्यात येत आहे. कांचन नगर–आसोदा रोड हा परिसरातील महत्त्वाचा मार्ग असून, या रस्त्यावरून दिवसभर



मोठ्या प्रमाणावर वाहनांची ये-जा असते. मात्र, रस्त्यावर पडलेल्या मोठमोठ्या खड्ड्यांमुळे दुचाकीस्वार घसरून पडण्याच्या घटना घडत असून, वाहनांचेही नुकसान होत असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. रस्त्यावरील धुळीमुळे परिसरातील रहिवाशांना श्वसनविषयक त्रास होत असल्याचेही स्थानिकांचे म्हणणे आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, लहान मुले आणि शाळकरी विद्यार्थ्यांना याचा अधिक फटका बसत असल्याचे नागरिकांनी सांगितले. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, या समस्येबाबत अनेक वेळा महानगरपालिका आणि स्थानिक लोकप्रतिनिधींकडे तक्रारी करण्यात आल्या. मात्र, अद्याप ठोस उपाययोजना झालेली नसल्याने संताप वाढत आहे. "आम्ही नियमितपणे कर भरतो, तरीही मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करावा लागत आहे," अशी भावना स्थानिकांनी व्यक्त केली. रस्त्याची तात्काळ दुरुस्ती करून खड्डे बुजवावेत, अन्यथा महानगरपालिका प्रशासन आणि संबंधित लोकप्रतिनिधींच्या विरोधात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही नागरिकांनी दिला आहे.

---

# काळ आणि माणूस' व 'पाथवे पोएम्स' पुस्तकांचे प्रकाशन!

## मान्यवरांच्या उपस्थितीने रंगला मेळावा

जन सम्राट टाईम्स

**मुंबई |प्रतिनिधी:** ज्येष्ठ साहित्यिक दिलीप पाटील यांच्या 'काळ आणि माणूस (बदलत्या समाजाचे चिंतन)' आणि 'पाथवे पोएम्स – जेंटल इंग्लिश व्हर्सेस फॉर क्वायट पाथवेज ऑफ लाइफ' या इंग्रजी कवितासंग्रहाच्या प्रकाशनाचा सोहळा रविवारी सायंकाळी त्यांच्या निवासस्थानी उत्साहात पार पडला. अभिवाचन, साहित्यचर्चा आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला साहित्य संमेलनाचे स्वरूप प्राप्त झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सतीश सोळांकूरकर यांनी केले. प्रारंभी दिलीप पाटील यांनी उपस्थितांचे स्वागत करून आपल्या साहित्यप्रवासाचा आढावा घेतला.

प्रा. अशोक बागवे, ज्येष्ठ रंगकर्मी व साहित्यिक नारायण जाधव आणि ज्येष्ठ साहित्यिक नारायण लाळे यांच्या हस्ते दोन्ही पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. प्रकाशनानंतर नारायण जाधव यांनी 'साद प्रतिसाद' आणि 'काळ आणि माणूस' या पुस्तकांतील निवडक लेखांचे प्रभावी अभिवाचन केले. त्यांच्या सादरीकरणाला उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी 'गमन' चित्रपटातील अभिनयासाठी सांस्कृतिक कलादर्पण रजनी पुरस्कार प्राप्त नारायण जाधव यांचा डॉ. अशोक पाटील यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. 'काळ आणि माणूस' या पुस्तकाचा परिचय राजीव जोशी, तर 'पाथवे पोएम्स' या कवितासंग्रहाचा परिचय



सतीश सोळांकूरकर यांनी करून दिला.

प्रमुख पाहुणे नारायण लाळे आणि प्रा. अशोक बागवे यांनी दिलीप पाटील यांच्या समाजाभिमुख व विचारप्रवर्तक लेखनाचे कौतुक करत अशा साहित्याची आजच्या काळात अधिक गरज असल्याचे मत व्यक्त केले.

पुस्तकांवरील चर्चेत नारायण लाळे, चांगदेव काळे, सनिद पाटील, अनंत जोशी, प्रकाश पाटील, किरण येले, मिलिंद मिरजकर, मनीष पाटील, प्रकाश गोठणकर, विकास भावे आणि अशोक गंगावणे यांनी अभ्यासपूर्ण समीक्षा सादर करत साहित्यकृतींच्या आशय, शैली आणि सामाजिक संदर्भांवर परखड मते व्यक्त केली. समारोपावेळी विनया पाटील यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात सुजाता पाटील आणि निवृत्त वरिष्ठ सीमाशुल्क अधिकारी सुनील पाटील यांचे विशेष योगदान राहिले. छायाचित्रण रमेश पवार (सुरभी स्टुडिओ) यांनी केले. स्नेहभोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली. अभ्यासपूर्ण चर्चा, प्रभावी अभिवाचन आणि साहित्यिकांच्या मुक्त संवादामुळे हा सोहळा साहित्य, संस्कृती आणि वैचारिक देवाणघेवाणीचा प्रेरणादायी उत्सव ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

---

जन सम्राट टाईम्स — अँकर न्यूज

# पुण्यातील 101 महापालिका शाळांना रविवारपर्यंत सुट्टी

## पूरस्थितीमुळे प्रशासनाचा निर्णय; पूरग्रस्त वारकऱ्यांच्या निवासासाठी शाळा उपलब्ध!

जन सम्राट टाईम्स

**पुणे । प्रतिनिधी:** पुणे शहरातील मुसळधार पाऊस, आषाढी वारी आणि निर्माण झालेल्या पूरस्थितीच्या पार्श्वभूमीवर पुणे महानगरपालिकेने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. महापालिका हद्दीतील तब्बल १०१ शाळांना रविवारपर्यंत सुट्टी जाहीर करण्यात आली असून, या शाळांचा वापर वारकऱ्यांच्या तात्पुरत्या निवासासाठी करण्यात येणार आहे. वारी आणि पूरस्थितीमुळे निर्णय संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्या पालख्यांसोबत लाखो वारकरी आषाढी वारीत सहभागी झाले आहेत. दरम्यान, देहू आणि आळंदी परिसरात मुसळधार पावसामुळे पूरस्थिती निर्माण झाल्याने अनेक वारकरी अडकले. त्यांना सुरक्षित निवारा उपलब्ध करून देण्यासाठी पुणे महापालिकेने १०१ शाळा तात्पुरत्या निवासस्थानी रूपांतरित केल्या आहेत. वारकऱ्यांसाठी सर्व सुविधा या शाळांमध्ये वारकऱ्यांच्या निवास, भोजन, पिण्याचे पाणी, आरोग्य सेवा आणि इतर आवश्यक सुविधांची व्यवस्था प्रशासनाकडून




करण्यात आली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणात तात्पुरता बदल करत रविवारपर्यंत सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. यापूर्वी भारतीय हवामान विभागाने पुणे जिल्ह्यासाठी ६ जुलै २०२६ रोजी रेड अलर्ट जारी केला होता. त्यानुसार मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी सोमवारी जिल्ह्यातील सर्व अंगणवाड्या तसेच प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांना सुट्टी जाहीर केली होती. प्रशासनाने नागरिकांना हवामान विभागाच्या सूचनांचे पालन करण्याचे आणि अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर न पडण्याचे आवाहन केले आहे.

### प्रशासनाकडून आवश्यक सुविधांची व्यवस्था

महापालिका हद्दीतील तब्बल १०१ शाळांना रविवारपर्यंत सुट्टी जाहीर करण्यात आली असून, या शाळांचा वापर वारकऱ्यांच्या तात्पुरत्या निवासासाठी करण्यात येणार आहे. वारी आणि पूरस्थितीमुळे निर्णय संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्या पालख्यांसोबत लाखो वारकरी आषाढी वारीत सहभागी झाले आहेत. दरम्यान, देहू आणि आळंदी परिसरात मुसळधार पावसामुळे पूरस्थिती निर्माण झाल्याने अनेक वारकरी अडकले. त्यांना सुरक्षित निवारा उपलब्ध करून देण्यासाठी १०१ शाळा तात्पुरत्या निवासस्थानी रूपांतरित केल्या आहेत. वारकऱ्यांसाठी सर्व सुविधा या शाळांमध्ये वारकऱ्यांच्या निवास, पिण्याचे पाणी, आरोग्य सेवा आणि इतर आवश्यक सुविधांची व्यवस्था प्रशासनाकडून करण्यात आली आहे.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306